जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७४३ दिनांक - १२/१०/२०२३**

**चतु:श्रृंगी पोलिस स्टेशन पुणे शहर**

## आयुष ऊर्फ बंटी विठ्ठल चव्हाण (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०३ साथीदार यांचे विरुध्द मकोका कारवाई

यातील फिर्यादी हे दि.११/०९/२०२३ रोजी गाडीवरुन कामाचे ठिकाणी जात असताना पत्रकार नगर येथील अचानक मित्र मंडळ चौक येथे आले असता,फिर्यादी यांचे ओळखीचा आयुष ऊर्फ बंटी चव्हाण यांचे गाडीला फिर्यादी यांचे गाडीचा कट लागलेने आयुष यांने रस्त्यात गाडी थांबवून फिर्यादी यांचे जवळ येवून माझे गाडीला कट मारतोस का असे म्हणुन त्याचे ॲक्टीव्हा गाडीचे डिकीत असलेले कोणत्या तरी धारधार हत्याराने फिर्यादी यांचे उजवे तळहातावर मारुन गंभीर जखमी केले. तसेच आयुष सोबत असले ०३ साथीदार यांनी शिवीगाळ करून हाताने मारहाण केली म्हणुन त्याबाबत **चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजी.नंबर ६४२/२०२३,भा.दं.वि.कलम ३०७,३२६,३२३,३४१,५०४,३४,भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपास दरम्यान यातील आरोपी नामे **१)आयुष ऊर्फ बंटी विठ्ठल चव्हाण,वय २१ वर्षे रा.निलज्योती अपार्टमेंट,गोखलेनगर,(टोळी प्रमुख) २)बाबु ऊर्फ बाबा सुर्यकांत डोंगरे,वय १९ वर्ष,रा.वडार हौसींग सोसायटी,ब्लॉक नं.११,मारुती मंदिराजवळ,वडारवाडी,पुणे ३)कृष्णा राजु पवार,वय १९ वर्ष,रा.८८३ मुकेश नगर,जुनी वडारवाडी,पुणे ४)मयुर ऊर्फ गणेश सुनिल विटकर,रा.वडारवाडी,पुणे (टोळी सदस्य)(पाहिजे आरोपी) यातील अ.नं.१ ते ३ यांना अटक करण्यात आली आहे.**

नमुद आरोपी आयुष ऊर्फ बंटी चव्हाण (टोळी प्रमुख) याने त्याचेसह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात नवीन साथीदार यांना सोबत घेऊन स्वतःची संघटीत टोळी करुन गुन्हे केलेले असून त्यांनी अवैध मार्गाने अर्थिक व इतर फायदा मिळवण्याच्या उददेशाने जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,गंभीर दुखापत,दरोडा व नागरीकांच्या मालमत्तेचे तोडफोड करुन नुकसान करणे,सर्वसामान्य नागरीकांच्या मध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणे,बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगणे,पोलिसांच्या आदेशाचा भंग करणे,बेकादेशीर जमाव जमविणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वांरवार केले आहेत.

दाखल गुन्हयास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२)३(४) चा अर्तंभाव करणेकामी वरिष्ठ पोलिस निरीक्षक चतुःश्रृंगी पोलिस स्टेशन श्री.बालाजी पांढरे यांनी मा.पोलिस उपायुक्त परिमंडळ ०४ पुणे श्री.शशीकांत बोराटे यांचे मार्फतीने मा.अपर पोलिस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे श्री.रंजनकुमार शर्मा यांना सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन वरील आरोपी यांना चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन,पुणे शहर गु.र.न. ६४२/२०२३,भा.दं.वि.सं.कलम ३०७,३२६,३२३,३४१,५०४,३४,भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियत्रंण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२)३(४) प्रमाणे मा.अपर पोलिस आयुक्त पुर्व प्रादेशीक विभाग पुणे श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग पुणे,श्रीमती.आरती बनसोडे ह्या करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णीक मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उप-आयुक्त,परी-४,पुणे,श्री.शशीकांत बोराटे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे श्रीमती.आरती बनसोडे यांचे मार्गदशनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन श्री. बालाजी पांढरे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.अंकुश चिंतामण,पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.जगन्नाथ जानकर, निगराणी पथकाचे सहा.पोलिस निरीक्षक,रत्नदीप गायकवाड, संतोष कोळी, पोलिस अमंलदार, अमित गद्रे व सुहास पवार यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्या नंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ६८ वी कारवाई आहे.**